# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 29/12/2021 (बुधवार)
(सायंकाळ)

---

### अकस्मात मृत्यु

1) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 20 कि. मी. अंतरावरील येथे दिनांक 28/12/21 चे 16:00 वा. ते 16.30 वा. सुमारास फिर्यादी नामे– कैलास भाउराव निखाळे, वय 35 वर्ष, रा. निमजी हा इन्फ्रा इंजिनियरींग कंपनी मध्ये सिक्युरीटी गार्ड म्हणुन दिवस पाळीला डयुटीवर हजर असतांना कंपनीतील लॉजीस्टीक पार्कमध्ये चर्चा सुरू होती कि, 'लॉजिस्टीक पार्कच्या कन्पाउन्डच्या मागे कसला तरी कुजल्याचा वास येत आहे' तेव्हा फिर्यादी व कंपनीतील हायड्रा ऑपरेटर सतीश नेवारे सह कंपनीच्या दुसऱ्या बाजुला जाउन पाहीले असता एक कुजलेल मानवी शरीर फिर्यादीला व हायड्रा ऑपरेटरला जुनी आय. टी. सी कंपनी च्या मागे लॉजिस्टीक पार्कचे कम्पाउन्ड चे मागे व श्री. गावंडे रा. नागपुर यांच्या निमजी शिवारातील शेतातील सिमेंट कॉक्रीट ने बांधलेल्या घराच्या मागची भिंत याचे मध्ये दिसुन आले. मृतदेहाची कवठी धडापासुन वेगळी झालेली दिसुन आली. मृतदेहाचे हाडे बाहेर आल्याचे व पुर्ण बॉडी सडल्याचे दिसुन आले. तसेच मृतदेहाचे कपडे काळपट रंगाचे असल्याचे दिसुन आले. सदर अनोळखी इसमाचा कुठल्यातरी अज्ञात कारणाने मृत्यु झाला असल्याचे दिसुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री मेश्राम पो.स्टे. कळमेश्वर मो.नं. 9075245059 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावरील कारला सालई रिठी काटोल येथे दिनांक 28/12/2021 चे 17:00 वा. सुमारास राजेश जिवन मोहरिया(मृतक), वय 48 वर्ष, रा. कारला हे शेतात असलेले बैलजोडी आणण्याकरिता गेले असता शेतात वीज पडल्याने ते वीजमध्ये अर्धवट जळुन मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गणेश शिवचरण मोहरिया, वय 31 वर्ष, रा. कारला यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार गौरव आगरकर पो.स्टे. काटोल मो. नं. 8421755849 हे करीत आहे.

3) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत पारडी रिठी मौदी धोतरा शिवार शिवलाल जग्गी उईके(मृतक), वय 35 वर्ष, रा. वार्ड कं 17 नरखेड हा दारू पिण्याच्या सवईचा होता. दि. 27/12/2021 चे सकाळी 08.00 वा. सुमारास शेतात पाणी ओलीता करीता गेला होता तो रात्री घरी परत न आल्याने त्याचा शोध घेतला असता दि. 28/12/2021 चे सकाळी 07.00 वा. सुमारास शेतातील विहिरीत मृत अवस्थेत मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ.संगीता शिवलाल उईके वय 28 वर्ष, रा. रमना नरखेड वाड्र क्र. 17 यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक दिनेश वरठे मो.नं 7038445782 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. वेलतुर – दिनांक 28/12/2021 चे 03.00 वा. चे सुमारास पो.स्टे. वेलतुर हद्दीत फिर्यादी यांची 16 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री नितेश डोर्लीकर मो.क्र. 9595678234 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर